दै. देशोन्नती दि. 17/02

# सोनखेड पोलिसांच्या सतर्कतेमुळे मतिमंद मुलगी मावशीच्या ताब्यात



देशोन्नती वृत्तसंकलन...

**सोनखेड** ■ डायल ११२ मुळे १९ वर्षीय मतिमंद मुलगी सोनखेड पोलिसांनी तिच्या नातेवाईकांच्या ताब्यात दिल्याची माहिती आहे. १५ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता ढाकणी येथील जागरूक नागरिकाने डायल ११२ ला फोन केला आणि आमच्या गावात एक मतिमंद मुलगी फिरत आहे, अशा आशयाची माहिती पोलिसांना दिली. त्यावरून सोनखेड पोलिसांनी तात्काळ तपासाची चक्रे फिरवून अंजली महादेव फुलारी (१९) रा. बारूळ कौठा ता.कंधार या मुलीला ताब्यात घेऊन तिचा फोटो आणि वर्णन हद्दीतील पोलीस पाटील व तंटामुक्ती अध्यक्ष यांच्या ग्रुपवर माहिती टाकल्यामुळे सदरील मुलगी ही वडेपूरी येथील शोभाबाई प्रकाश फुलारी या तिच्या मावशीकडे राहते आणि ती सकाळी माता रत्नेश्वरी गडावर जाण्यासाठी निघाली. त्यावेळी तिचा रस्ता चुकल्यामुळे हा प्रकार घडला. अखेर दुपारी १२ वाजता तिच्या मावशीच्या नात्याची सोनखेड पोलिसांनी शहानिशा करून त्या मतिमंद मुलीला तिच्या नातेवाईकाच्या ताब्यात देण्यात आले.

दै. लोकमत दि. 17/02/24

# पोलिसांच्या तत्परतेने गतिमंद मुलगी सापडली

लोकमत न्यूज नेटवर्क

**मारतळा :** लोहा तालुक्यातील ढाकणी गावात तरुण मतिमंद मुलगी रस्त्याने फिरत असल्याची माहिती येथील युवकांनी नांदेड पोलिसांना दिली. त्यानंतर सोनखेड पोलिसांनी क्षणाचाही विलंब न करता गावात दाखल होऊन गतिमंद मुलीला पोलिस ठाण्यात नेले. सदर मुलीची माहिती व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपला पोस्ट केल्यानंतर पोलिसांनी नातेवाइकांची अन मुलीची भेट घडवून आणली.

वडेपुरी, ता. लोहा येथील शोभाबाई फुलारी या आपल्या बहिणीची मतिमंद मुलगी अंजली फुलारीसोबत रत्नेश्वरी मंदिराकडे पूजेचे साहित्य घेऊन निघाली. यावेळी गतिमंद अंजली रस्ता चुकून वडेपुरीपासून तीन कि. मी. अंतरावर असलेल्या ढाकणी गावात गेली. इकडे मावशी शोधाशोध करत होती. ढाकणी येथील विद्यार्थ्यांनी ही माहिती पोलिसांना भ्रमणध्वनीवरून दिली. हा संदेश सोनखेड पोलिसांना देण्यात आल्यानंतर स. पो. नि. पांडुरंग माने, फौजदार रवी बुरकुले व विशाल, चालक विशाल कांबळे हे जीप घेऊन गावात दाखल झाले. गतिमंद मुलीला घेऊन सोनखेड पोलिस ठाण्यात आणले. मात्र, मुलीला बोलता येत नव्हते.

त्यामुळे या मुलीची सर्व माहिती पोलिस पाटील, तंटामुक्त गाव समिती अध्यक्षांच्या व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपवर पोस्ट केली. काही वेळानंतर ही मुलगी बारूळ, ता. कंधार येथील असून, तिची मावशी शोभाबाई फुलारी यांच्यासोबत ती वडेपुरी येथे काही दिवसांसाठी राहायला आल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी नातेवाइकांना ठाण्यात बोलावून घेतले. गतिमंद मुलीचे आधार कार्ड व नातेवाइकांचे आधार कार्ड यांची माहिती जाणून घेत खात्री करून मुलीला नातेवाइकांच्या ताब्यात दिले.